


इयानचा फेरफटका

स्वमग्नतेवर (ऑटिझम) एक गोष्ट

लॉरी लिअर्स, चित्र - कॅरेन रिट्झ, मराठी - मानसी



आज खूप छान हवा पडली आहे. माझ्या ताईबरोबर, ताराबरोबर बागेत जाऊन बदकांना दाणे घालण्यासाठी एकदम उत्तम दिवस आहे. फक्त एकच अडचण आहे, माझ्या भावाला, इयानला पण आमच्याबरोबर यायचं आहे.

"अरे इयान, तू इथेच का नाही थांबत?" मी म्हणते. इयान उत्तर देत नाही, कारण तो स्वमग्न आहे, म्हणजे त्याला 'ऑटिझम' आहे. खिडकीच्या काचेवर जोरात बोटं आपटत तो रडू लागतो.


"बरंSSS ठीक आहे!" मी म्हणते. "आई, हा येऊ शकतो ना?" मी आईला विचारते.

"हम्म्म..." आई म्हणते. "त्याच्यावर पूर्ण वेळ बारीक लक्ष ठेवावं लागेल. तुम्हाला जमेल ना?"

"हो, जमेल." मी म्हणते.

तारा पण मन डोलावते. "ज्यूली, मात्र तू त्याचा हात धर." ती मला सांगते.




POWER POPS

इयानचा मेंदू इतर लोकांपेक्षा वेगळा आहे. त्याला गोष्टी वेगळ्याच प्रकारे दिसतात.

नैनच्या हॉटेलसमोरून जाताना इयान आत जाऊन छतावर सावकाशपणे गोल गोल फिरणारा पंखा बघत बसतो. तिथे वैट्रेस गडबडीत वेगवेगळे खाद्यपदार्थ, आईस्क्रीम घेऊन जात आहेत, पण इयानचं त्यांच्याकडे अजिबात लक्ष जात नाही.

"एक सोडा घेऊया." मी म्हणते. पण इयानची नजर पंख्यावरून हटत नाही. शेवटी त्याला ओढतच बाहेर न्यावं लागतं.





BEARS
BEARS
BEARS
BEARS



इयानला गोष्टी ऐकूसुद्धा वेगळ्याच येतात....

फायर ब्रिगेडचं इंजिन कर्कश सायरन वाजवत त्याच्या शेजारून जरी गेलं तरी इयानचं तिकडे लक्ष जात नाही.


पण मान वाकडी करून तो असं काहीतरी ऐकत असतो, जे मला ऐकू येत नाही. "चल लवकर" त्याचा हात ओढत मी म्हणते.



इयानला गोष्टींचा वास वेगळ्याच प्रकारे येतो.....

सौ. पॉटरच्या फुलांच्या दुकानात मी सुंदर जांभळ्या रंगाची सुवासिक फुलं त्याच्या नाकाजवळ नेते. तो वास सहन न होऊन इयान नाक मुरडून तोंड वळवतो.
पण पोस्ट ऑफिस समोरून जाताना तिथल्या खडबडीत गरम विटांना नाक लावून इयान भिंतीचा वास घेतो.
"थांबव ते!" मी म्हणते. "काय वेडेपणा आहे!" आणि कोणी त्याला बघायच्या आत मी त्याला तिथून ओढून नेते.







इयानला गोष्टी वेगळ्या प्रकारे जाणवतात....

तळ्याजवळ, मी एक मऊ पीस घेऊन त्याला मानेवर गुदगुली करते. तो बिथरून ओरडतो आणि पीस ढकलून देतो.
पण जेव्हां मी आणि तारा बदकांना दाणे घालतो, तेव्हां इयान जमिनीवर लोळून दगडांवर गाल घासतो.
"उठ इयान!" त्याला हात धरून मी उठवते. "कोणीतरी पाय देईल तुझ्यावर"





इयानला चवीसुद्धा वेगळ्या प्रकारे घेतो….


खाऊच्या दुकानांजवळून जाताना तो पिझ्झा, हॉट डॉग, प्रेटझेल याकडे ढुंकूनही बघत नाही.
पण त्याला माझ्या खिशातले उरलेले बदकांसाठीचे दाणे हवे असतात.
"मी आणि तारा जेवणासाठी हे दाणे अजिबात खाणार नाही आहोत. " मी त्याला सांगते. "चल पिझ्झा घेऊया."
पण इयान अजिबात जागचा हालत नाही. एक एक करून दाणे चावत बसतो. कधीकधी मला त्याचा अस्सा राग येतो!


NI DONUTS
BEARS
BEARS
BEARS
BEARS
RESH
TZELS

"मी पिझ्झा घेऊन येते." तारा म्हणते. "ज्यूली, तू इयानबरोबर इथे थांब."

एका बाकावर बसून मी पिझ्झाची वाट बघू लागते. "इयान, बस शेजारी." मी म्हणते. पण इयान हात उडवत माझ्याकडे दुर्लक्ष करतो.






एकदाची तारा दोन पिझ्झा घेऊन येते.
"इयान कुठे आहे?" ती विचारते.
इयान उभा होता तिथे मी बघते पण इयान आता तिथे नसतोच!
माझ्या पोटात गोळा येतो, आणि दोन क्षण मला काहीच सुचत नाही.



तारा पळत तिथल्या एका बाईजवळ जाते. "निळा शर्ट घातलेला छोटा मुलगा दिसला का हो?" ती विचारते.

ती बाई नकारार्थी मान हलवते. "तो कदाचित बागेच्या दुसऱ्या बाजूला बेसबॉल बघायला गेला असेल." ती सुचवते.

पण इयानला बेसबॉल आवडत नाही.




एक माणूस खांद्यावर आपल्या मुलीला घेऊन चालला असतो.

"हरवल्यासारखा वाटेल असा एखादा मुलगा दिसला का हो तुम्हाला?" आवंढा गिळत मी त्यांना विचारते.

"नाही." तो माणूस उत्तर देतो. "पण आम्ही गोष्टी सांगणाऱ्याकडे जातो आहोत, कदाचित तो तिथे गोष्टी ऐकत उभा असेल. "

पण इयानला गोष्टी ऐकण्यात काहीच स्वारस्य नाही आहे.






तारा इयानला शोधायला धावते.

मी डोळे घट्ट बंद करून इयानसारखा विचार करायचा प्रयत्न करू लागते.

इयानला फुगे फुगवायचं मशीन आवडतं. फुस्स फुस्स आवाज करत ओढून ताणून रंगीत फुग्यांना वेगवेगळे आकार देणारं फुग्याचं मशीन!

त्याला करंज आवडतं. पाण्याजवळ चेहेरा नेऊन डोळ्यालगत वाहत जाणारं पाणी पाहायला त्याला आवडतं.

तेवढ्यात बागेच्या मध्यात असलेली मोठी घंटा वाजू लागते. बॉग! बॉग! बॉग! आणि मग मला अचानक आठवतं - इयानला ती घंटा सर्वात जास्त आवडते!




मी जोरात धावत घंटेकडे जाते.


इयान सापडतो!

घंटेखाली आडवा होऊन तो घंटेचा टोला पुढे मागे हलवतोय. त्याला विशेष आवडत नसलं तरी मी त्याला घट्ट जवळ घेते.




झोपाळ्यांपाशी तारा दिसते, तिला मी हाक मारते.
ती धावत पळत येते आणि आम्हाला दोघांना जवळ घेते





"तुला हवं तस्सं थांबत आपण घरी जाऊ" मी इयानला सांगते.
तळ्यापाशी थांबून आम्ही त्याला दगडांशी खेळू देतो. इयान रस्त्याच्या कडेने सगळे दगड एका मागे एक ओळीत रचून ठेवतो. त्याच्यावर कोणी चुकून पाय देऊ नये म्हणून मी त्याच्या समोर उभी राहते.






सौ. पॉटरच्या फुलांच्या दुकानापाशी न थांबता आम्ही थेट पोस्ट ऑफिस जवळ जाऊन थांबतो. इयान हव्या तेवढ्या विटांचा वास घेतो, आणि कोणी बघेल याची मी अजिबात फिकीर करत नाही.

कोपऱ्यावर आम्हाला ऐकू येत नाही असं काहीतरी ऐकण्यासाठी इयान थांबतो, तेव्हां आम्ही सुद्धा शांतपणे थांबून ऐकायचा प्रयत्न करतो.





नैनच्या हॉटेल मध्ये चक्कर येईपर्यंत मी गोल गोल फिरणारा पंख बघते.



घरी पोहोचल्यावर मी म्हणते, "फेरफटका मस्त झाला इयान".
आणि एका क्षणासाठी इयान माझ्याकडे बघून हसतो.

इयानचा फेरफटका

स्वमग्नतेवर एक गोष्ट

लॉरी लिअर्स, चित्र - कॅरेन रिट्झ, मराठी – मानसी

ज्यूलीला बागेत जायची घाई झाली आहे, पण ऑटिसम असलेल्या आपल्या लहान भावाला बरोबर घेऊन जाण्याबद्दल ती साशंक आहे.

इयान प्रत्येक गोष्ट वेगळ्या पद्धतीने करतो. हॉटेल मध्ये त्याला सँडविच आणि आईस्क्रीम मध्ये अजिबात रुची नाही आहे. त्यापेक्षा त्याला तिथला पंख फिरताना बघायला आवडतो.
बागेत त्याला मऊ पिसाचा स्पर्श आवडत नाही, पण दगडांवर गाल टेकवून झोपायला आवडतं.

इयानला समजून घेणं ज्यूलीसाठी खूप अवघड आहे. पण जेव्हां तो बागेत हरवतो, तेव्हां ज्यूलीला समजतं, की जगाकडे वेगळ्या दृष्टीने - इयानच्या दृष्टीने - पाहणे हाच त्याला शोधण्याचा सर्वात उत्तम मार्ग आहे.